# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 08/12/2021 (बुधवार)

---

### जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना अटक

पो.स्टे. मौदाः– अंतर्गत 3 कि.मी. अंतरावरील माथनी टोल नाका मौदा येथे दिनांक 07/12/2021 चे 00.10 वा. दरम्यान मौदा पोलीस पथक पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, काही इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन मौदा पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी जावून नाकाबंदी करुन एम. एच.–40/ सी.डी.–1146 क्रमांकाच्या आयसर ट्रकला थांबवुन तपासले असता सदर वाहनात आरोपी नामे– अमर संतोष पडोळे, वय 41 वर्ष, रा. अडयाळ व 2. मोहन रमेश चौधरी, वय 34 वर्ष, रा. नवेगाव ता. पवनी जि. भंडारा यांच्या ताब्यातुन 40(गाई) जनावरे कि. 4,00,000/–रू. निर्दयतेने वाहतुक करतांना मिळुन आले. वाहनासह एकुण किंमती 12,00,000/– रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पोलीस हवालदार मनोहर जंगवाड, पो.स्टे. मौदा यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे वरील आरोपीविरुध्द कलम 11 (1)(ड) प्राणि निर्दयतेने वागणुक प्रतिबंधक कायदा, सहकलम 5(अ),9 अ महाराष्ट्र प्राणी रक्षण अधिनियम सहकलम 185 मोवाका तसेच कलम 109, 34 भादवी काद्ययान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपीतांना सुचनापत्रावर सोडण्यात आले असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार मनोहर जंगवाड हे करीत आहे.

### घरफोडी

पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत 02 कि.मी. अंतरावरील परसोडा रामटेक येथे दिनांक 18/11/2021 ते दिनांक 06/12/2021 चे 07.30 वा. चे 07.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– नितीन सुखदेव हटवार वय 41 वर्ष रा. परसोडा रामाजीनगर ता. रामटेक यांचे घरी मोलककरणीचे काम करणा–या आरोपी क. 1) सौ. मंदा रामभाऊ क्षीरसागर व इतर एक महिला दोन्ही रा. भोजापुर ता. रामटेक यांनी फिर्यादी राहते घरात बेडरूम मध्ये लाकडी टेबलवर ब्लेंकेट चादरच्या घडीच्या मध्यभागातील गॅप मध्ये ठेवलेले 1,58,000/–रूपये किंमतीचे सोन्याचे दागीने असलेली सोनेरी रंगाची पर्स ज्यावर लांबट ज्वेलर्स असे लिहलेली चोरून नेली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम 381, 34 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास मसपोनि स्वाती यावले मो. नं. 9011655284 या करीत आहे.

### अपघातात मृत्यू

पो.स्टे. मौदा :– अंतर्गत 13 कि.मी. अंतरावरील उमरी शिवार कंपनीच्या समोर नॅशनल हायवे क 53 भंडारा नापुर कामठी येथे दिनांक 06/12/2021 चे 19:20 वा. दरम्यान सागर शंकर वांदे वय 26 वर्ष व गणेश लक्ष्मन कानफाडे 34 वर्ष दोन्ही रा. नागपुर हे अंतीम संस्कार करून भंडारा कडुन नागपुर कडे जात असता अज्ञात वाहनाच्या चालकाने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वगाने व निष्काळजीपणे चालवुन हिरो स्पलेन्डर नंबर नसलेली मोटारसायकल मागुन धडक देवुन 100 ते 125 मीटर फरफकत घेवुन गेला व आपल्या ताब्यातील वाहन पडवुन घेऊन गेला. या अपघातात सागर वांदे व गणेश कानफाडे हे दोघेही गंभीर जखमी होवुन मरण पावले.

सदर प्रकरणी सरतर्फे पोहवा चांगदेव कुथे पोस्टे मौदा यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 184, 134, 177 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार काळे मो न 9822549695 हे करीत आहे.

## गळफास लावून मृत्यु

1) पो.स्टे. बेला :– अंतर्गत बेला येथे दिनांक 07/12/2021 चे 09.00 वा. ते 09.30 वा. पुर्वी सुमारास अमित दिलीपराव कावळे (मृतक) वय 28 वर्षे रा. बेला याने अज्ञात कारणाने आपले स्वताचे घरी स्लॅपला असलेल्या लोखंडी हुकाला पिवळया रंगाची नॉयलान दोरी बांधुन गळफास घेतल्यानंतर तो मृत अवस्थेत आढळून आला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– दिलपराव चंपतराम कावळे वय 52 वर्षे रा. वार्ड क्र. 6, बेला यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. बेला येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोहवा चौधरी मो. क्र. 9823186686 हे करीत आहे.

2) पो.स्टे. जलालखेडा :– अंतर्गत 20 कि. मी. अंतरावरील लोहारी सांवगा येथे दिनांक 07/12/2021 चे 02.00 वा. सुमारास रामभाउजी मारोतराव राउत(मृतक), वय 73 वर्ष, रा.लोहारी सांवगा यांची प्रकृती नेहमी खराब राहील्याचे कारणावरून तसेच सततचा नापिकीमुळे कर्जबाजारी झाल्याने त्यांनी आपले राहते घरातील गोठयात गळफास घेतल्यानंतर ते मृत अवस्थेत आढळून आले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– संजय रामभाउजी राउत, वय 41 वर्ष, रा. लोहारी सांवगा यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. जलालखेडा येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सहायक फौजदार सातंगे मो.नं. 9823374436 हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यु

पो.स्टे. जलालखेडा :– अंतर्गत 08 कि. मी. अंतरावरील पिंपळगाव राउत येथे दिनांक 07/12/21 चे 19.00 वा. ते 23. 00 वा. दरमयान जयश्री छत्रपती टेकाम(मृतक), वय 32 वर्ष, रा. पिंपळगाव राउत हिने अज्ञात कारणावरुन विषारी औषध प्राशन केले. तिला उपचाराकरीता ग्रामीण रुग्णालय काटोल येथे नेले असता तिचा मृत्यु झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– छत्रपती मारोतराव टेकाम वय 38 वर्ष रा. पिंपळगाव राउत यांचे रिपोर्टवरुन पो. स्टे. जलालखेडा येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सफौ जोशी हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर